विशेष दिवाणी दावा क्र. १३/२०२०
शिवाजी वि. बालाजी व इतर

**आदेश नि.क्र. ३२ वर**

(CNR No. MHLA050002782020)

वादीने या अर्जाद्वारे कागदपत्र दाखल करुन घेण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलाचे म्हणणे असे की, या अर्जासोबत वादीने प्रमाणपत्र दाखल केले आहे. ते दाखल करुन घेण्यात यावे. प्रतिवादींच्या वकिलाचा युक्तीवाद असा की, दाव्यासोबत ते कागदपत्र दाखल केलेले नव्हते. उशिरा दाखल केलेले हे कागदपत्र अनावश्यक असून केवळ कामकाज लांबवण्यासाठी दाखल केले आहे. अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा दावा हा अब्रुनुकसानीबाबत भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाखल केलेले प्रमाणपत्र हे वादीच्या कार्यपध्दतीबाबत दिलेले आहे. त्यामुळे हे कागदपत्र वादाशी निगडीत असून दाखल करुन घेणे आवश्यक आहे. त्या कागदपत्राचा खरेखोटेपणा हा पुराव्याआधारे समोर येणार आहे. त्यामुळे हा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कांहीही नुकसान होणार नाही. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

कागदपत्र दाखल करण्यास मंजुरी दिली आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.

दि.२०/११/२०२१.